भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष ४७] त्रैमासिक [अंक १–४

१. बांदल घराण्याची एक तकरीर

(प्रा. ग. ह. खरे व श्री. ना. के. जोशी)

(१) प्रस्तुत तकरीर हिरडस मावळचे देशमूख बांदल यांच्या घराण्याविषयीं आहे. जेधे शकावलींत अफझलखानवधाची हकीकत सांगून झाल्यानंतर त्या प्रसंगावर अज्ञानदासानें केलेल्या पवाड्यांत हनुमंत अंगद रघुनाथाला। जेधे बांदल शिवाजीला॥ असा निर्देश आला आहे. अफझलप्रसंगाच्या हकीकतींतही बांदलांच्या जमावाचा निर्देश आहे. बांदल घराण्याला पवाडेकारानें जेध्यांच्या पंक्तींत नेऊन बसविलें असलें तरी त्या घराण्यांतील ऐतिहासिक कागदपत्र मिळून ते प्रकाशित होण्याबाबत दोन घराण्यांत फार मोठें अंतर पडलें आहे. मुख्यतः राजवाड्यांचा १५ वा खंड, शिवचरित्रसाहित्याचा २ रा खंड, ऐतिहासिक फार्सी साहित्याचा १ ला खंड, शिवचरित्रप्रदीप व रामदास रामदासी मासिकाचे खंड यांत जेधे घराण्यांतील शेकडों फार्सी-मराठी कागदपत्र, शकावली, करीणे इत्यादि साहित्य प्रकाशित झालें असतां प्रत्यक्ष बांदल घराण्यांतील दहा देखील कागद प्रकाशित होऊं नयेत याचें आश्चर्य वाटतें. बांदल घराणीं कोणी शोधलींच नाहींत कीं शोधून त्यांजकडे कांहीं मिळालें नाहीं याचा उलगडा होत नाहीं. असो.

(२) प्रस्तुत तकरीर श्री. के. व्ही. बांदल, वकील पुणें यांनीं मंडळाकडे आणून दिली. ती एका फूलस्कॅप कागदाच्या वहींत शिन्याच्या शाईनें कागदाच्या एका बाजूस लिहिली आहे. सध्या तिचीं एकंदर पानें १२॥ आहेत. पण मधून मधून कोरी जागा सोडली आहे. शिवाय वहींतील १ लें पान गहाळ झालें आहे. यामुळें आरंभींचा कांहीं अंश मिळालेला नाहीं. या तकरीरींत त्या घराण्यांतील एक कर्तबगार स्त्री दिपाई मुख्य वर्ण्यबिंदु आहे. तिच्या अनुषंगानें त्या घराण्यांतील इतर पुरुषांची कामगिरी वर्णिली आहे. बांदलांची या तकरीरींत आलेली वंशावळ अशी —

१ कृष्णाजी बांदल × दिपाई

साबाजी निंबाळकर — २ चांदजी — ३ बाजी

रंभाजी × उदाबाई — ४ रायाजी

५ संकाजी — ६ मानाजी — ७ बाजी — ८ चांदजी — ९ संताजी

(३) या शिवाय या तकरीरींत आणखी कांहीं बांदल आले आहेत; पण त्यांचीं नातीं समजत नाहींत. तसेंच तकरीर देणारा रायाजीचा नातू होता येवढें लक्षांत येतें. पण त्याच्या पाच मुलांपैकीं कुणाचा लेक हें ध्यानांत येत नाहीं. फक्त तो मानाजीचा लेक नव्हता येवढें तकरीरीवरून समजतें. येथील कृष्णाजी बांदलाच्या कांही हक्कांसाठीं जेध्यांशीं सहा अयशस्वी चकमकी झाल्यानंतर सातव्या चकमकीच्या वेळीं आपल्या बायकोच्या पायांत कांहीं कारणांनीं घातलेली बेडी तोडून तिचा आदर केल्यावर तिनें यास ओवाळलें व नंतर तिनें घातलेल्या अटीप्रमाणें लढाई केली असतां कृष्णाजीस जय मिळाला अशी हकीकत एके ठिकाणीं आली आहे (रा. १५।३०२।२१६, १५।३६३।३९२, १६।१।५). श. १५४७ (इ. स. १७२५-२६) नंतर एका महजराच्या वेळीं हा उपस्थित होता (शिवचरित्रप्रदीप पृ. २२६). श. १५५८ (इ. १९३६) नंतर मावळांत शहाजीची सत्ता पक्की करण्यासाठीं दादाजी कोंडदेवानें जे उद्योग केले त्यांत त्याचा कृष्णाजीशीं संबंध आला. दादाजीची याशीं एक चकमक झाली असतां तींत दादाजी परास्त झाला होता; पण बोलणीं करण्यासाठीं म्हणून त्यानें त्यास बोलावून घेतलें व कैद केलें. पुढें तो कैदेंतच मेला असावा. याचा मुलगा बाजी यानें मात्र विजापुरांत झालेली शहाजी-पठाणांची लढाई, तसेंच शिवाजीच्या समयांत झालेली खळद-बेलसरची लढाई व जावळीचा पहिला प्रसंग यांतही भाग घेतला होता. जावळीच्या दुसऱ्या प्रसंगाच्या सुमारास बाजी बहुधा मेला. श. १५७९ (इ. १६५७) च्या महजरांत बाजीचा मुलगा रायाजी उपस्थित होता (रा. १७।१०।१८). पण या तकरीरींत मात्र रायाजी बरींच वर्षें नेणता म्हणजे अज्ञान होता म्हणून नोंदलें आहे. असें असतांही अफजल-भेट, शायिस्तेखानावरील छापा, विशाळगडप्रसंग, पुरंदरवेढा, आग्रावारी इत्या-दींत रायाजीनें बऱ्यापैकीं भाग घेतला आणि त्याची आजी दिपाई ही मोठ्या हिरीरीनें त्यास साह्य करीत होती. राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराज दक्षिणदिग्विजयास गेले असतां इकडे सुभेदार राघो बल्लाळ अत्रे याच्या आधिपत्याखालीं मुघलांशीं झालेल्या लढाईंत रायाजी मारला गेला.

(४) येथपर्यंत ही तकरीर बरीच माहिती देते. हे प्रसंग सांगतांना तकरीरीच्या कर्त्यानें काल व स्थल यांचा कांहीं ठिकाणी विपर्यास केल्याचें उघड दिसतें. उदा. हींत पन्हाळ्याचा वेढा व विशाळगडप्रसंग शायिस्तेखाना-वरील छाप्यानंतर घातला आहे. बाजी प्रभूच्या मरणाची तिथि भाद्रपद वद्य ४ अशी दिली आहे. पण ती आषाढ वद्य १ पाहिजे. शिवाजी दिल्लीस गेला नव्हता, आग्र्यास गेला होता. राजाराम दिल्लीहून सुटून आला नव्हता, जिंजीहून परतला होता. अशा कांहीं लहान-मोठ्या चुका या तकरीरींत असल्या तरी कांहीं अगदीं नवी किंवा जुन्यांत भर घालणारी माहितीही हींत आहे. बाजी प्रभूची हकीकत

Scanned by CamScanner

जुन्या माहितीत थोडी कां होईना पण भर घालणारी निश्चित आहे. शिवाजी दक्षिण-दिग्विजयास गेला असतां राघो बल्लाळ अत्रे या सुभेदाराच्या आधिपत्याखालीं रायाजी मुघलांशीं लढत असतां मेला ही माहीती नवी आहे.

(५) या तकरीरींत चार मूळ पत्रांच्या नकला दिल्या आहेत आणि एका पत्राचा नुसता हवाला दिला आहे. पण नकला सध्याच्या शास्त्रीय पद्धतीनें केलेल्या नसल्यामुळें त्यांत कांहीं दोष उत्पन्न झाले आहेत; पाठ शुद्ध राहिलेले नाहींत; कालनिर्देशांत क्वचित चुका झाल्या असण्याचा संभव आहे; कांहीं उणें अधिक झालें आहे. तथापि तीं पत्रें बनावट नसून खरीं असावीं.

(६) पहिलें पत्र सु. १०५१ (श. १५७२–७३, इ. १६५०–५१) चें असून त्यांत बाजी नाईक आपली जमेत घेऊन शिवाजी महाराजांच्या स्वारींत गेला असल्याचें सांगितलें आहे. येथें गनहली असें स्थलनाम आलें आहे असें वाटतें; पण त्याचा नीट पत्ता लागत नाहीं. या स्वारींत बाजीनें जें शौर्य दाखविलें त्याबद्दल त्यास भाणसदरें येथील महसुलाचें इनाम मिळालें. अशाच प्रकारचें इनामपत्र पऱ्हर खुर्द या गावाबाबतही मिळालें

(७) दुसरें पत्र सु. १०७२ (श. १५९३–९४, इ. १६७१–७२) चा एक कौलनामा आहे. त्यांत पदाजी (दादाजी) यशवंतराव शिवतरकर यानें कांहीं हरामखोरी केल्याबद्दल शिवाजी महाराजांनीं त्यास पकडलें. यामुळें भय खाऊन रायाजी परागंदा झाला. तेव्हां शिवाजी महाराजांनीं त्यास हें आश्वासनपत्र (कौल) पाठविलें आहे. पदाजी (दादाजी) यशवंतराव याचें आडनांव मोरे असें या तकरीरींत दिलें आहे. शिवचरित्रसाहित्य खंड २ लेखांक २५३ हें शिवाजी महाराजांचें एक आश्वासनपत्र आहे. यांतही पदाजी (दादाजी) यशवंतराव शिवतरकर याचा उल्लेख असून त्यानें केलेल्या बेसंगपणाच्या वर्तणुकीबद्दल महाराजांनीं त्याचे डोळे काढून त्यास किल्ल्यावर कैदेंत टाकलें. पण यामुळें गुंजण मावळचा देशमूख हैबतराव शिलिमकर हा भय खाऊन परागंदा झाला होता. म्हणून त्यास हें आश्वासनपत्र दिलें आहे. याचा व तकरीरींत आलेल्या आश्वासनपत्राचा काल एकच आहे. पदाजी यशवंतरावाच्या हरामखोरीचा उल्लेख सभासदी बखरीमध्येंही आहे. (शं. ना. जोशी संपादित आवृत्ती पृ. ६).

(८) तिसरें पत्र सु. १०७९ (श. १६००, इ. १६७८) या वर्षाचें असून त्या पत्रांत दिपाईनें आपल्या वतनाची वाटणी आपल्या तीन नात (पणत ?) सुनांमध्यें केल्याचें सांगितलें आहे. यांत संकराजी, मानसिंग व चांदजी अशा तीन पुरुषांचीं नावें आलीं आहेत. वर दिलेल्या वंशावळीवरून हे तिघेचकाय पण यांसह बाजी व संताजी असे आणखी दोघे मिळून पांच पणतू दिपाईला होते असें ठरतें

Scanned by CamScanner

पण या पत्रांत या पांचां पैकीं तिघांचींच नांवें असून उरलेले दोघे गाळले आहेत. हें कसें झालें ?

(९) चौथें पत्र शिवाजीचा मुलगा संभाजी यानें धाडलें आहे. यांत शिवाजी महाराजांनीं चंद्ररावावर स्वारी केली असतां तींत बाजीनें भाग घेतला नव्हता, त्या वेळीं दिपाईनें आपला मुलगा सरनौबताबरोबर पाठविला होता असें सांगितलें आहे. तेव्हां येथें पहिल्या पत्राशीं स्पष्ट विरोध येत आहे. शिवाजीनें जावळी प्रकरणांत दोनदां हस्तक्षेप केला होता. पहिल्या वेळीं बाजी अंशभागी होता तर दुसऱ्या वेळीं नव्हता असें मानलें म्हणजे कांहींशी संगति लागते. तथापि दुसऱ्या वेळीं बाजी नव्हता तर दुसरा कोणता मुलगा दिपाईनें पाठविला ? जुन्या कागदपत्रांत वडील शब्द केवळ पिता किंवा थोरला या अर्थी येत नसून पूर्वज या अर्थीही येतो. तसा मुलगा हा शब्द नातवासाठीं तर वापरला नाहीं ना ? असो. मूळ तकरीर अशीः—

(२) ला तरी भेटीस न गेले त्यास राजश्री दादाजी पंती हुजूर महाराजास आर्जी पाठविली कीं कृष्णाजी नाईक बांदल भेटत नाहीं पुढे [हुकूम काय त्यावरून माहाराजाचा] हुकूम आला जे जेणेकरून हातास लागे तो आर्थ करणे मग राजश्री दादाजीपंती कृष्णाजी नाईक बांदल यासी भाकमाल बेलभंडार पाठवून भेटीचा प्रसंग केला तेव्हां कृष्णाजी नाईक यानी मुदा घातला जे महाराजांस बारा मावळे जहागीर झाली तो आमल चालिला आपण पुंडावे करीत होतो पुढे काय करावे कोणे गोष्टीनें राहावे हे आज्ञा करावी त्यास राजश्री दादाजीपंती आभये दिल्हे जे तुमची भेटी झालियावरी तुमचा मुदा महाराजास लेहून पाठऊ तुमचे उर्जीत करून म्हणवून किले कोंढाणियासी नेऊन धरून चौरंग केले त्यामुळे बारा मावळे याणी धास्ती घेतली की ये गोष्टीने आमचे उर्जीत नाही जे कृष्णाजी नाईक बांदल यासी इमान देऊन नेऊन येसी गोष्ट जाली तेव्हां आमची गत काय इकडे मातुश्री दिपाई आऊ बाजी नाईक बांदल यासी घेऊन परागंदा झाली ते कोकण प्रांती गेली मागे प्रगणा वैरणा पडिला कोणी कोणास धरीनासा झाला ते समयो मातुश्री दिपाई आऊ याणी बाजी नाईक बांदल यासी सांगितले की तुम्ही राजश्री साबाजीराजे निंबालकर यांजकडे जाणे ते पुरातन सोईरे आहेत त्यांपासी तुम्ही राहणें माघे आम्हास ईश्वर आहे आमची फिकीर न धरणे म्हणऊन सांगितले बाजी नाईक राजेश्री सावाजे राजे निंबालकर यांकडे गेले भेटी घेऊन त्याजवळ राहिले तो समयोचित महाराज राजश्री शाहाजी राजे साहेबांचा व राजश्री साबाजी राजे निंबालकर यांची भेटी झाल्या तो विज्यापुरी पटणां (पठाण) चालोन आला तेव्हा माहाराजांनी विचार केला जे हा (जे) पटण (पठाण) मोडावा म्हणऊन युध्धास गेले युद्ध जाले ते समई बाजी नाईक बांदल निंबालकराकडे होते त्याणी बाजी नाईक बांदल यासी सांगितले कीं तुम्ही डेरियांत राहाणे त्यावरी याणी उत्तर केले कीं आपल्या बापाची गती यैसी जाली मातुश्रीने तुम्हांकडे पाठविले तुमची व माहा-

Scanned by CamScanner

राजाची भेटी जाली तेंव्हा आपण आनश्रूत राहिलो याउपरी डेरियांस राहून काय करावे तुम्ही युध्दास जाता आणि आपण युध्धास यावें हे खरे वाचोन सार्थक नाहीं यैसे उतर केले त्यावरून राजश्री निंबालकर याणी बाजी नाईक यांचे पाठीवरी हात ठेविला भला मर्द आहेस म्हणऊन घोडा बैसावयासी दिल्हा आणि युद्धांस बरोबर घेऊन (३) गेले युद्ध जाले पठाण मोडिला ते समयी बाजी नाईक याणी तरवार केली तेंव्हां माहाराजाकडील भले लोक होते त्याणी माहाराजांस जाहीर केले, कीं बाजी बांदल कृष्णाजी नाईक यांचा पुत्र यांणे आम्हांदेखत तरवार केली ऐसे वर्तमान निवेदन केले तेंव्हां महाराजांनी पुसिले कीं कोठे आहे तो आणा मग भले लोंकी आर्ज केला की आपल्या जमावांत नाहीं निंबालकराच्या जमावात आहे त्याजवरून राजश्री साबाजी राजे निंबालकर यांजकडे सांगोन पाठविले कीं तुम्हाकडे बाजी बांदल आहे म्हणऊन ऐकिल तर त्यास भेटीस पाठविणे म्हणऊन सांगोन पाठविले त्यास निंबालकरांनी संकेत मनांत धरिला की भेटीस नेता काय गती होईल हे नकळे म्हणऊन माहाराजांस आर्जी पाठविली कीं बाजी बांदल आपणाकडे नाहीं त्यावरी माहाराजांनी भले लोक यासी पुसिले कीं तुम्ही सांगितले जे बाजी बांदल त्यांजकडे आहे त्यांणी सांगून पाठविले कीं आपणाकडे नाहीं हे काय वर्तमान तेंव्हां मागती भले लोकी अर्ज केला कीं त्यांजकडे आहे हे खरे त्याणी कां संकेत धरिला हे न कळे साहेब धणी आहेत तेंव्हां माहाराजांनी मागती राजश्री निंबालकर यांकडे सांगोन पाठविले जे आपण संकेत धरिला तो अर्थ आपणास कळला तरी यैसा पदार्थ नाहीं बाजी बांदल याणे तरवार युद्धप्रसंगी केली याजकरितां त्याजवरी कृपाळू होऊन त्याचे उर्जीत करावे यैसं आहे तरी त्यास पाठऊन देणें म्हणऊन सांगोन पाठविले मग निंबालकर याणी शतोंश माणून बाजी बांदल यासी घेऊन येऊन पायांवरी घातला तेंव्हां माहाराजांनी सिरी हात ठेऊन उठविला आणि पुसिले कीं कृष्णाजी बांदलाचा पुत्र तूच कीं काय म्हणऊन पुसिले त्यावरून राजश्री साबाजी निंबालकर याणी सांगितले कीं हा होय दुसरा नाही तेंव्हां बाजी बांदलास पुसिले कीं तुम्ही येथें यावयासी कारण काय हे वर्तमान सांगणे त्यावरून आर्ज उभा राहून केला जे निंबालकर पुरातन सोईरे माझी ध्वाडी चांदजी नाईक आपले वडील भाऊ यांची कन्या उदाबाई राजश्री साबाजी राजे निंबाळकर यांचे पुत्र रंभाजी निंबालकर यासी दिल्हीं आहे यैसियासी यावया कारण यैसे जे माहाराजास बारा मावळे जहागीर जाली म्हणऊन राजश्री दादाजी कोंडदेव सुभेदार यासी आमल बैसावयासी पाठविले याणी कुल महालो-महाली हुकूम पाठविला जे भेटीस येणे त्यास आपले बाप कृष्णाजी नाईक बांदल भेटीस न गेले म्हणऊन नामजाद पाठविली तेथे युद्धे जाले तऱ्ही न गेले मनांत संशये धरिला जे राजश्री दादाजीपंत यांजकडे (४) न जावे जाणे तेंव्हां माहाराजांकडे जावे यैसे मानून राहिले तो मागती राजश्री दादाजीपंती बेलभंडार पाठविला आणि भेटीस बोलाबिले तेंव्हां आपले बापाची मुदा घातला जे आपण पुंडावे केले मोहरे काय

Scanned by CamScanner

करून असावे यैसा मुदा घातला राजश्री पंती मान्यें केला जे तुमचे मुदे असतील ते भेटी झालिया उपरी माहाराजांस लेहून पाठऊन तुमचे उर्जीत करूं यैसे कबूल करून नेऊन त्याची गती केली ते माहाराजास विदीत आहे याजबदल मातोश्री व कबिला घेऊन परागंदा जालो सेवट लागला पाहिजे म्हणऊन यांजकडे आलो तों भाग्यांचा उदये जाला यैसे वर्तमान आहे त्यावरी माहाराजांनी वर्तमान आंतःकर्णात आणून कृपाळू होऊन अभये-वचन बोलिले जे तुझा बाप माहाराजाकडे येत होता हा संशये कळला नाहीं निरपराधी पंती यैसे वर्तमान केले याउपरी तूं येकनिष्ठेने सेवा केली यैसे देखोन बहुमान वर्त्रे कृपाळू होऊन देऊं लागले तेव्हा मागती बाजी नाईक याणे अर्ज केला की मजला बहुमान कैसियासी पाहिजे मातुश्री व कबिला सर्व परागंदा जाला आहे त्याचे धड जाले म्हणजे सर्व पावले मीच घ्यावे यैसे नाहीं सर्वश्रेष्ठ धणी साहेब आहेत स्थापना करावी यैसा आर्ज केला त्यावरून माहाराज कृपाळू होऊन अभये वचन दिल्हें की तू बरा माणूस आहेस तुझ्या हाते साहेबकाम घेणे आहे मग बाजी नाइकाने पायांवरी डोई ठेविली यैसे केलियानें बहूत उर्जीत होईल त्या उपरी माहाराज बोलिले तूं बेईमान होऊ नये म्हणऊन सरकारांतून दूधभात आणिला त्याजवरी बाजी नाईकाजवळून हात ठेविला जे बेइमान न व्हावें स्वामिकार्यास आंतर न करावें यैसे सत्य स्मरोन हात शपथपूर्वक ठेवणे याणी शफतपूर्वक हात ठेविला आणि अर्ज केला कीं या उपरी महाराजांनी आपली क्रिया घेतली तरी माझेही वाईट या उपरी न करावें स्थापना करावी तें महाराजांनीं मान्यं करून दुधाभातावरी हात ठेवून रुमालावरी केशरी भाक दिल्ही ते आपले मातुश्रीस नेऊन दाखवणे आणि कबिलासुद्धा वतनावरी येऊन राहाणे आपले जमावानसी तयार आसणे इतकें आभयें जाले मग बहुमान वर्त्रे दिल्हीं मग पायांवरी डोई ठेऊन निर्भये होऊन राजश्री निंबालकरा सम-वेत डेरियासी आले मग निंबालकर यांचा निरोप घेऊन मातुश्री दिपाई आंवा यासी भेटले जाले वर्तमान सांगितले त्यांणी संतोश मानून भाक व कुल कबिला सुद्धा महा-लात आले मुळिक(का)चा स (संच) णी केली जमावाचे लोक ठेविले तों सवेंच माहाराज राजश्री सिवाजी राजे साहेब यांचा मुकाम खेड ता खेडबारे येथे आला तेथून हुकूम दिपाई आवास जाझा (ला) त्याज प्रा जमावानसी गेली जमाव नजरेने पाहोन कित्येक गोष्टीचा मजकुर पडिला तों बेलसरावरी मोंगल आला येसे वर्तमान (५) आलें तेव्हां कुल माहालोमाहालचें लोक व देशमूख दिपाई आवा मोहि{म{मेस रवाना करूं लागली ते मोहीम मान्यं केली जमावानिसी मातूश्री दिपाई आवा गेली युद्ध-प्रसंग जाला साहेबकामावरी लोक पडिले सुमारे अडीचसे साहेबकाम जाले त्या उपरी माहाराजानी विचार केला कीं बारा मावले हातास आली पुढे जावली सुरू करावी यैसा तह करून मोहीम केली या बरोबर मागती दिपाई आऊ जमाव घेऊन गेली माहाराज राजश्री स्वामीचा मुकाम जावलीवरी जाला तेथून हुकूम चंदररायासी पाठविला कीं भेटीस येणें ते गोष्ट त्याणी अमान्य {न{ केली म्हणऊन युद्धप्रसंग माडिला

Scanned by CamScanner

युद्ध तीन रोज जाले शेवट चंदररायाणी नष्टाई मोडिली याचा विचार दिपाई आऊ व त्यांजकडील सरणोबत बोलाऊन नेला आणि विचार पुसो लागली कीं ही गोष्ट केसी करावी म्हणऊन विचारिले त्यावरून दिपाई आऊ व सरणो [बत*] यांनी आर्ज केला कीं आम्ही जिवंत आसतां विचार दुसरा नाहीं चंदरराव धरून आणितो साहेबीही आपले नजरेनें पाहावें युद्ध समयी कोणकोण साहेबकाम करिता [त*] ते पाहावें ऐसा अर्ज केला तेव्हां माहाराजांनी धारेचे पान देऊन युद्धावरी रवाना केले युद्ध जालें चंदरराव धरून आणिला आणि माहाराजा संनीध उभे केले त्याउपरी माहाराज मेहर्वान दिपाई आऊ व सरणोबतावरी जाले जे शफत केली ते येकनिष्ठपणे केली ते कलो आली माहाराज तुमचे उर्जीत करितील येथून गेलियावरी तुम्हांस सनदा देऊ ऐसे अभयेवचन दिल्हें जावलीची बंदोबस्ती करणें रूपाजी आदटराऊ देशपांडे ता। पौडखोरे यांबरोबर हजार माणूस ठेविले त्यांमध्यें आपले लोकही होते बंदोबस्ती करून मुलूकगिरीस विचारून सुभेदार करून ठेविला मग राज्याची वृद्धी करणे स्वारी जाली त्यास बहूत दिवस जाले मग मातुश्री दिपाई आऊ व सरणोबत यांणी आर्ज केला कीं अभये-वचन दिल्हे त्याचा मार्ग लक्षीत आसो म्हणऊन अर्ज केला त्यावरून कृपाळू होऊन सनदा दिल्या त्याची नकल बीतपसील.

(६) आज रक्तखाने राजश्री सिवाजी राजे दाम दौलतहू बजानेबू कारकुनानी हल इस्तकबाल ता। हिरडस मावल बिदानंद सु॥ इहिदे खमसैन अलफ बाजी नाईक बांदल देशमूख ता। सजकूर गजहलियामध्यें आपले जमितीनेंसी साहेबाचे मसलतीस येऊन येकतारी केली त्यावरून देशमुखावरी महर्वान होऊन इनाम अजरामऱ्होमती मौजे भाणसदरे देह १ येक देखील नख्तियाती महसुली व बाजे बाबा व कुलबाब इनाम दिल्हे असे याचे दुमाला करणे अवलाद–अफलाद चालवणे दर द(ह)रसाल ताजे खुर्द खका(ता)ची उजूर न करणे तुम्ही तालीक घेऊनं असल खुर्दखताची देशमुखापासी फिरोन देणें सदरहू देह रकम महसूल टके ९३।६ बाजे बाब टके १९॥ यकूण टके ११२॥। ६ येकसे बारा टके बेतालीस रुके यासी दिल्हे असे दुमाला करणे.

याज प्रों पऱ्हर खुर्द

येणेप्रों वतनी सनदा दिल्ह्या त्याउपरी कांहीं दिवस.जाले तो मागतीं अबदुलखानं अला त्यास माहाराजानी नतीजा दिल्हा ते समयी सेवा महाराजांनी घेतली त्याउपरीं शास्तखान पुणियास आला त्यासीही माहाराजांनी नतीजा दिल्हा तेव्हाही सेवा घेतली पुढे माहाराज किल्ले विशाळगडास गेले त्याबरोबर आपले आजे रायाजी नाईक बांदल व बाजी प्रभू देशपांडे सरनोबत व लोक होते त्यास किले विशाळगडास नामजाद होऊन किले पनालियास बेबुदीकारणे गेले तो सिधी जोर विजापुराहून फौजनसी अलां माहाराज विशालगडास आले मागे गलीम आला तो महिना भाद्रपद मास वद्ये चतोर्थी ते दिवशी आला माहाराजानी कुल जमाव उतरिला तेव्हा रायाजी नाईक यासि

Scanned by CamScanner

बोलाविले आणि हुकूम फरमाविला जे तुम्हीं व सरनोबत व लोक घेऊन युद्धास जाणे गनीम जोरावर राहता नये म्हणऊन हुकूम केला त्यास बाजी परभू सरनोबत यांही अर्ज केला की रायाजी नाईक नेणते आहेत संततही जाली नाहीं अम्ही व लोक 'साहेबकामावरी आलों या उपरी निदान अले मागे कबिले आहेत त्याचे व रायाजी नाईक नेणता आहे याचे उर्जीत करणार माहाराज धणी आहेत म्हणऊन रायाजी नाईक यासिं हती देऊन पायावरी डोई ठेऊन जमाव सुद्धा गडाखाली उतरले युद्धे तुंबल जाले गनीम (७) मारून काढिला ते समई बाजी परभू व लोक साहेबकामावरी पडिले हे वर्तमान माहाराजांनी आपले नद्रनें पाहिले ऐसे वर्तमान जाले तेव्हां रायाजी नाईक यांणी अर्ज केला कीं बाजी परभू सरनोबत व लोक पडिले त्यास विल्हे लावावयासिं जावे लागते याचा हुकूम क.ये तेव्हां माहाराजानी भले लोक बरोबर देऊन रायाजी नाईक यासिं पाठविले मागे बहूत खेद केला तो लिहितां पुर्वत नाहीं रायाजी नाईक यांणी बाजी परभूस व लोकांस विल्हेस लाऊन अले माहाराजाच्या पायावरी डोई ठेविली आणि अर्ज केला जे माझे लोक व सरनोबत होता तो ये समई साहेबकामावर खर्च जाले तैसेंच जागोंजागा लोक खर्च जाले याउपरी आपला नेणतपणा मोहरे आपली गती कैसी होईल म्हणोन खेद माणून उभे राहिले ते समई माहाराज [मो. जा.*] स्वामी यांनी मस्तकीं हात ठेविला जे साहेबा देखतां काजेकामे केली त्याप्रों तुमचे वंशपरंपरेने चालविने व जे लोक पडले त्यांचेही चालविणं दिलगीर न होणे म्हणऊनं हस्त ठेऊन उठविले आपल्या डेरियास जाणे मग रायाजी नाईक विशालगडी मुकाम होता तोपर्यंत तेथेंच राहिले माहाराजास मागते फिरोन येतेवेळेस मुकाम कसबे सिंद ता। हिरडस मावल येथे जाला तेव्हां मातुश्री दिपाई आवा यासी बोलाऊन आणून बहूत प्रकारे समाधान करूं लागले तेव्हां दिपाई आऊ यानी पायावर डोई ठेऊन अर्ज केला कीं माझे लोक व बाजी परभू देशपांडे सरनोबत होते ते अणकेही लोक साहेबकामावरी खर्च जाले पदरीचे भांडवल सरले तरी साहेबीं त्यांचे घरचे समाधान करावें व रायाजी नेणता आहे याचे वंशपरंपरेने चालवावें म्हणजे आम्हास सर्व पावले आपले विशिई पुर्वीचे अभये दिल्हे आहे ते माहाराज चालवितील म्हणऊन अर्ज केला त्याउपरी साहेबी मेहरवान होऊन हाती धरून उठविली आणि अभयेवचन दिल्हे की तुझा बाजी परभू देशपांडे सरनोबत व लोक पडिले त्यांचे समाधान करणे साहेबास आहे त्यांच्या घरास जावें लागते तुम्ही फिकीर न करणे त्यावरून मातुश्री दिपाई आऊ यांनी बचन मान्य केले मग साहेब बाजी परभूच्या घरास गेले त्याचे घरचे बायेका व लेक व भाऊबंद यांचे समाधाम केले त्याप्रो त्यांचेही साहेब चालवीत आले आहेत ऐसियावरी माहाराज राजगडास गेले तो कितेका दिवसो मिरजा राजा किले पुरंधराखाली आले तेथे युद्धे जाले ते समयी मुरारबाजी परभू व भले लोक (८)

Scanned by CamScanner

कितीक पडले गनीम जोरावर ते समई तह झाला सत्तावीस किले देऊन महाराज साहेब यानी दिपाई आऊस महाराज मातुश्री साहेबाजवळ ठेविली आणि आपण व मिरजा राजा समावीत दिलीस गेले ते वर्तमान तपसीलवार लिहितां शक्त नाही माहाराज यशवंत होऊन दिलीहून स्वराज्यास आले मातुश्री साहेबाचे दर्शन जाले ते समई दिपाऊई आऊ यानी पायावरी डोई ठेविली तेव्हां मातोश्री साहेबीं दिपाई आऊचे सेवेचे वर्तमान सांगितले कीं दिपाईनें येकनिष्ठपणे या विचारांत सेवा केली तरी तुम्ही यांचे वंशपरंपरेने चालऊन सेवा घेत जाणे म्हणऊन हाती दिल्ही माहाराजांनी बहूत संतोष मानून मातुश्री साहेबाचे वचन मान्यें केले त्याउपरी राज्याची वृद्धी बहूत जाली माहाराजास किले रायेगडास आले त्यास दादाजी यशवंतराव मोरे शिवतरकर यांनी हरामखोरी केली त्यास नतीजा दिल्हा म्हणऊन दहशत माहालोमाहाली पडली यामुळे रायाजी नाईक याचा नेणतपणा कोणी विचार सांगावयास नाहीं दिपाई आऊ यांनी सांगावे तरी हुजूर मातोश्री साहेबाजवळ हमेशा राहिली होती त्यास न कळत कबिला घेऊन मौजे चिखली नजीक देऊलघाट येथे गेले ते पांच वर्षे होते त्याउपरी माहाराजांनी कौल देऊन वतनावरी आणिले कौलाची तालीक बीतपशील.

श्री माहादेव

मातुश्री आईसाहेब

कौलनामा अज रक्तखाना राजश्री सिवाजी राजे साहेब दाम दौलतहु तो { मावले } रायाजी बांदल देशमूख तां हिरडस मावळ सुहुर सन इसने सबैन व अलफ दादे कौलनामा यैसाजे दादाजी येशवंतराव शिवतरकर यानी हरामखोरी केली याबदल त्यास धरून दस्त केले त्यावरून तुम्ही शंका धरून बाहेर गेलेस ऐसियास हाली तुमचे बाबे राजश्री रंभाजी राजे निंबालकर यानी लिहिले कीं रायाजी बांदल यासी कौल देऊन वतनावर नेले पाहिजे म्हणऊन उत्तर तुम्हास कौल मरहमत केला असे कोणे बाबे शक आंदेशी न करिता तुम्ही वतनावरी येणे आणि आपले देशमुखीचा कारभार करणे (९) तुमच्या जिवास खता होणार नाहीं व देशमुखी पिढी दर पिढी चालऊन हे बाबे श्री–देवाची आण व मातुश्री–साहेबाची आण असे व भाक माल पाठविली असे घेऊन कवीहाल होऊन येऊन सुखे असणे कौल असे याउपरी अभये कौल घेऊन वतनावरी रायाजी नाईक अणिले वतनावरी स्थापन केली मागती हुजूर दर्शनास बोलाविलें तेव्हा रायाजी नाईक हुजूर दर्शनास गेले दिपाई आऊची भेट झाली उभयेता मिळून महाराजाच्या दर्शनास गेले पायावर घातला आहे हा नेणता आहे साहेब मेहरवान जाले पाहिजे त्या उपर माहाराज कृपाळू होऊन उठविले आणि आज्ञा केली की सुखरूप राहाणे आजपासून हुजूर असणे वतनाचा कारभार येथून करण येसे वर्तमान जाले त्याउपरी माहाराज कितीका दिवशी चंदीस मसलतीस जाऊ लागले तेव्हां रायाजी

Scanned by CamScanner

नाईक बिज्यापुरा पावेतो गेले ते माघारे महाराजानी फिरविले तुझा नेणतपणा आहे चंदीची मसलतीस बहूत दिवस लागतील तुझे पोटी संतान व्हावे लागते व मातुश्री साहेब यानी हाती दिल्हा आहे तरी तुम्ही माघारी जाणे चंदीची मसलत सुरू करून येऊन तेव्हां हुजूर येणे त्या हुकमावरून माघारे आले आपल्या वतनावरी राहिले त्यास थोडकिया दिवसामध्यें मोगल येऊन गाधाडी तलेगाव घेतले याजबद्दल राघो बलाल अत्रे मुळीकगिरी मध्ये फौजनसी ठेविले होते त्यांस हे वर्तमान कळले त्यावरून राघोपंत यांणी रायाजी नाईक यासीं सांगोन पाठविले की आपले जमावानसी येणे साहेब काम आहे त्यावरून आपले जमान व स्वार घेऊन गेले तेथे युद्ध जाले गनीम माघारा गांवात घालून गांव घेतला ते समई आपले आजे रायाजी नाईक साईब कामावरी ठार झाले ते समई राघोपंत व भिकाजी फुलाजी देशपांडे ता। हिरडस मावळ याणी रायाजी नाईक यासि काढून डेरियासि आणिले व भले लोकही त्याकडील कित्येक जखमी होते ते आणिले तेव्हां राघोबलाल अत्रे यानी भिकाजी फुलाजी यासी पुसिलें की रायाजी नाईकास विल्हे करणे जे त्यावरून त्यांनी उतर केले जे येथे करता नये वतनावर न्यावे लागतात त्यावरून राघोपंती त्याची रवानगी केली मग जाल्या युद्धाची आखरे माहाराज राजेश्री साहेब (१०) चंदीचे मसलतीस आस्ता हुजूर पाठविली तेव्हां वर्तमान विदीत जाले मागे रायाजी नाईक यासी विल्हे लाविले त्याची खंती दिपाई आऊ याणी धरली यास्तव साहा महिनियानी फार वेथा प्राप्त झाली तेव्हां दिपाई आऊ धणी आपले स्वमुखे वाटणी केली याची नकल बी तपसील

श्री शके १६०० कालयुक्ताक्षी संवत्सरे आषाढ मास शुध ५ पंचमी शनवार ते दिवसी राजश्री दिपाई आवा देशमूख ता। हिरडस मावळ सुहूर सन तिसा सबैन अलफ ते दिवशी आपल्या मुखे बोलली जे आपल्या नातसुना तिघी यासीं वाटून दिल्हे बी तपसील

राजश्री संक्राजी नाईक	राजश्री मानसिंग नाईक	राजश्री चांदाजी नाईक
१ सिका	२ इसापती :—	२ इसापती
२ इसापती :—	१ पिसवड	१ भोलावले
१ महुडे बु॥	१ पऱ्हर खुर्द	१ भाणसदरे
१ निगुडघर	२	२
२		
१ शेतमळा मौजे आळंदे ता। मजकूर		१ पाटीलकी मौजे इंगवली
		३

येणे प्रों करून दिल्हे आहे या बरहुकूम चालावे मुलकातून हकपैकी सिकियाची खर्च काढून उरल ते बरहक वाटून घ्यावे हा कागद सही

Scanned by CamScanner

लोकांनी सिकियाची चाकरी करून काजकाम करावे पेशजी कष्ट मेहनत केली म्हणोन गांवखंडया व कास खंडी वहिती सेते व टेके दिल्हे ते येणे प्रमाणें चालत आले आहे बी तपसील :—

पिकणे	वहिती सेत	सालबकर गाव खंडी
मौजे नांद	मौजे महुडे बु॥	१ सालव
पो गांवखंडी	इसापत पो खंडी	२ मजरे
१३	१॥	१ सायेवाडी
		१ भावटमाळ

(११) मोरे गावखंडी	दिघे गावखंडी	वहिती सेत
मौजे दापकेघरपैकी १८	१८ मौजे नीवगन	मौजे भोलावडे
वाजी परभू देशपांडे	१८ मौजे मोझरी	इसापत पै॥
मौजे पऱ्हर बु॥ पैकी	१८ मौजे गुढे	रकम टके १२
गावखंडी १८	१८ मौजे सिखली	

आबाजी बांदल मोकदम मौजे कुंड   कंक :—

गावखंडी	वहिती सेत मौजे	मौजे म्हसर खु॥	वहिती सेत
१८ मौजे सिलिंब	पहुडे बु॥	पो गावखंडी १८	मौजे म्हउडे बु॥
१८ मौजे कुड	इसाफत पैकी		इसाफत पौ॥
१८ मौजे राजिवडी	रकम खडी		रकम मण कैली
१८ मौजे कारोंगण	१८		॰॥॰
४			

विचारे :—		चोर	
		मौजे गोवडी पो	वहिती सेत मौजे
मौजे वाठार पो	वहिती सेत मौजे	गाव खंडी १८	पहुडे बु॥ इसापती
गांव खंडी	महुडे बु॥ इ॥ पौ॥		पो रकम खंडी १८
१८	१८ रकम खंडी	रयोजी बांदल	
		मौजे संगमनेर	वहिती येत मौजे
		पो गावखंडी	निगुडघर इपासत पो
		१८	रकम कैली मण ८२॥

Scanned by CamScanner

जोशी कलमे सिरवळ	बरदाडे
मौज सांगवी गाव पो	मौजे पिसर्वे वहिती सेत मौज पिसर्वे
धर्मादाव खंडी १०	पो गांव खंडी १ इसापत पौ रकम टके लाग १०
पाले गांव खंडी	रेणुसा वहिती सेत मौजे निगुडघर इ॥ पो
१० मौजे देवघर	बारक्या २ एकूण रकम केली खंडी १०४
१० मौजे म्हसर बु॥	संताजी परखंडे
१० मौजे सिरगाव	खासनीस मौजे आपटी गावखंडी १०
१० मौजे उंबरगण	भोयाकडे मौजे निगुडघर इसापत पौ रजपूत
४	वजा करून बाकी गांवखंडी १०
पिलाजी परखंडा	वहिती सेत मौजे
मौजे मुहुडे खुापैकी	महुडे बु॥ ई ॥ पौ रकम
गाव खंडी १	खंडी केली मण ०=॥
(१२) दिवळ्या मौजे नादगाव पैकी गावखंडी १०	रंभनाक महार साळवकर मौजे
किनरे मौजे रायेरी गाव पौ खंडी १०	आळंदे पौ इनाम सेत पो
	आंब्याची पट्टी पौ वहिती
	रकम टके १०

येणेप्रमाणे गावखंडी व वहिती सेते व टके मुळवे व चाकरीचे लोक यांनी स्वामिकार्याची सेवा केली लोक पडले म्हणऊन दिपाई आऊनी त्यास दिल्हे त्या प्रो चालत आले आहे ऐसियांसि दिपाई आऊ थोडकियाच दिवसांत वारली सर्वेच्च माहाराज राजेश्री साहेब स्वदेशास आले ते प्रतापगडास जाऊन श्री भवानीचे दर्शन घेऊन किले रायगडास गेले ते समई कुल वतनदार हजर जाले तेव्हां महाराजांनी याद केली की रायाजी बांदल देशमुख ता। हिरडस मावळ हा गाधाडी तळे ।वी साहेबकामावरी पडला हे वर्तमान मसलतीमधे जाहीर जाले होते त्याचे पुत्र कोण्ही आले आहेत की नाहीत ऐसे पुसता बाबाजी बाजी प्रभू देशपांडे शेवेसी उभा होता त्याने अर्ज केला जे रायाजी नाईक याचे पुत्र पाच जण आहेत हुकूम जाला तरी सेवेसी आणितो संकराजी नाईक व मानाजी नाईक व बाजी नाईक व चांदजी नाईक असे चौघे जण हुजूर गेले पांचवा संतांजी नाईक फारच लहान याजकरितां घरी ठेविला ऐसियासि हुजूर दर्शन घेंतले माहाराजांनी नद्रेने पाहुन सनीध बैसविले आणि वस्त्रे देऊन तुमचे आपण चालवू ऐसे आभयेवचन देऊन मागती माहलास पाठविले ऐसे वर्तमान कष्टमेहनतीचे वतनाचे जाले तेव्हां दाखला त्याचा का जाला नाहीं त्याउपरी माहाराजांनी पुणियात आस्ता कुल वतनदाराचा दाखला केला तेथे महजर व मनसुब्या कित्येक जाल्या साक्षीनसी कियांनसी जाल्या तेव्हां कां दाखला याच्या वडलांनी केला नाहीं माहाराज राजेश्री आबासाहेब साहेबाचे काजकिर्दीस सेवा केली

Scanned by CamScanner

त्यास साहेबांनी अर्जी मनास अणून मेहेरवान होऊन सनदा दिल्ह्या त्याची तालिका बी तपशील

(१३) स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ८ दुर्मतीनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया भ्रगुवासरे क्षत्रिय कुलावतंस सिंव्हासना धीस्व [र *] श्री राजा शंभु छत्रपती स्वामी यांनी राजश्री गोपाळ रायाजी देशाधिकारी प्रांत मावळ यांसि आज्ञा केली ऐसी जे चंदररायावरी मसलहत सुरू केली होती ते वख्ती बाजी बांदल देशमूख हजर नव्हता दिपाई देशमुखीण ताा हिरडस मावळ सरनोबत घेऊन मसलहतीस पाठविले तीही मसलतीच्या कामास येखतारी केली म्हणऊन कैलासवसी स्वामीने सन इहिदे खमसेनात दिपाई }स{ बांदल (लास) साडी चोळी म्हणऊन इनाम मौजे पऱ्हेर खुर्द ताा मजकूर देह १ येक देखील नख्तियात बाजे बाब कुलबाब दिधले तेणे प्रो. चालत आले हाली तुम्ही स्वामीचे सनदेची उजूर करिता म्हणऊन दिपाईचा नातु संकराजी रायाजीचा लेक हुजुर येऊन विदीत केले व कैलासवासी स्वामीची पत्रें दाखविली त्यावरून कळो आले ऐसियांसि मौजे पऱ्हेर बांदल साडी चोळी म्हणून दिपाईस इनाम दिल्हे अवलाद अफवाद चालवीत जाणे ताजे सनदेची उजूर करीत न जाणे तालीख लेहून घेऊन येणेप्रमाणे वतन खात आलो तेव्हा तरी हा दाखला करावा होता त्याउपरी पातशाही गर्दी जाली तेव्हा कुल वतनदार तुळापुरी पाो पुणे येथे जमा जाले ते समई दाखला कां केला नाहीं तैसाच नवलाख्याचे उंबरे येथे कुल जमीदार नेऊन अदबात ठेविले तेव्हां आपले चुलता मानाजी नाईक बांदल देशमूख व महादजी बाजी देशपांडे ताा हिरडसमावळ यासि नेऊन अदबांत ठेविले तेव्हां गरिबागुरिबाची दाद होत होती तेव्हां दाखला का केला नाही त्याउपरो राज्याची वृद्धी मागती जाली माहाराज राजश्री राजाराम साहेबाचे दिली (चंदी) हून स्वदेशासी आले तेव्हां तरी दाखला करावा होता त्या उपरी माहाराज मातुश्री आईसाहेबाचे कालकीर्दीस (१४) दाखला का केला नाहीं ऐसीयांसि आपणास देशमुखी देणे माहाराजाचे आहे त्याप्रमाणे देशमुखीचा भोगवटा अनभवीत आसो सांप्रत संकराजी बांदल येऊन स्वामी पासी उभा राहिला जे सिका व देशमुखी आपली ऐसीयासि हा कांहीं आपले वशाचा नव्हे वरकड सरंजामी लोक वडिलापासोन सिकियाची [चाकरी*] करीत आले त्यास गावगंना नेमणूक करून दिल्हे आहे त्याप्रमाणे याच्या ही वडिलांस मौजे संगमनेर ताा मजकूर येथील गावखंडी १८ येक व वहिती सेत मौजे निगुडघर येथे इसापत पैकी ८२।। अडीच मणाची याच्या वडिलांनी साल दरसाल आम्हापासून चिठी घेऊन महसूल खावा आणि सिकियाची चाकरी करावी हे आपल्या वडिलापासून चालत आले आहे ऐसे आडनावाचे बांदल बहूत आहेत आपली हकीकत ऐसी आहे त्यास स्वामी खावंद आहेत बरहक इनसाफ करावा जाल्या करिण्याची तकरीर शेवेसी श्रुत व्हावी म्हणऊन तकरीर लेहून दिल्ही.

Scanned by CamScanner